स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 23–06–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 14. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 15. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 16. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 75ः– नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग, झोनल कार्यालय {सा.प्र.वि.} तसेच नागरी सुविधा केंद्रामध्ये दैनंदिन कामाकरिता लागणारे कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदीसाठी नवीन दरकरार निश्चित करण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र. 437 दि. 29.08.2016 व मा. आयुक्त यांचे दि. 14.09.2016 चे मंजुरी नुसार वार्षिक खर्च रु. 50 लक्ष ची ई–निविदा मागविण्यात आली असता तीन निविदाधारकांचे दरसुची मधील संपूर्ण दर निम्नतम नसल्याने तिन्ही निविदाधारकांची संयुक्त निम्नतम दराची सूची तयार करण्यात येवून 1) मे. गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स नागपूर, 2) मे. पी. ॲन्ड जी सेल्स कार्पोरेशन, नागपूर 3) मे. सुदर्शन पेपर कनव्हर्टींग वर्क्स, नागपूर यांनी निम्नतम दरामध्ये एक टक्का सूट देण्याबाबतचे पत्र कार्यालयात सादर केले आहे. सार्वत्रिक निवडणूक–2017 ची आचार संहिता लागु असल्याने व दैनंदिन कामाकरिता लागणारी कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे या संयुक्त दरास मा. आयुक्त यांनी दि. 12.01.2017 ला मंजुरी प्रदान करुन कार्यादेश देण्यात आले आहे. संयुक्त दरावर उपरोक्त निविदाधारकांकडुन पुढील तीन वर्षाकरिता कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदी करण्यास्तव येणारा प्रतिवर्ष खर्च रु. 50 लक्ष पद क्र. 09 (A20100120214) अंतर्गत करण्यात येईल. तरी स्थायी समिती सभेपुढे माहिती तथा नोंदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित प्रकरणात संचिकेतील पान क्र. १७ वर

आचार संहिता दरम्यान म.न.पा. स्थायी समिती संस्थगित असल्यामुळे सभा होणे शक्य होणार नाही असे नमूद केले याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यात काय तरतूद आहे याबाबत स्थायी समितीने निगम सचिवास विचारणा केली असता निगम सचिवाने स्पष्ट केले की, स्थायी समिती ही संस्थगित राहत नाही व कायद्यात अशी कुठलेही तरतूद नाही.

प्रस्तावित विषय अतिशय महत्वाचा आहे असे प्रशासनास वाटत होते तर निवडणूक आयोगाची परवानगी प्राप्त करून हा विषय स्थायी समिती कडून मंजूर करून घेता आला असता परंतू प्रशासनाने असे का केले नाही? यापूर्वी स्थायी समितीने आचारसंहीताच्या काळात आयोगाची परवानगी घेवून अतिमहत्वाच्या कामास विभागाने मंजूरी प्राप्त करून घेतलेली आहे, असे अनेक उदाहरणे आहेत.

प्रस्तावित प्रकरणात स्थायी समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, निविदाकारा बरोबर करारनामा सुध्दा झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा १) मधील २) मध्ये काय प्रावधान आहे याबाबत विभागाने तपासावे.

प्रस्तावित विषय विभागाने स्थायी समिती समोर सादर केला तो मुळातच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूद प्रमाणे नाही हे या स्थायी समितीचे मत आहे. त्यामुळे ही निविदा एकमताने नामंजूर करण्यात येते. सक्षम प्राधिकारणी ही स्थायी समिती असल्यामुळे स्थायी समितीची मंजूरी न घेता कार्यादेश देण्यात आला असल्यामुळे यात कुठलेही भुगतान विभागास करता येणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच हया प्रकरणात ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कायद्याचे पालन केले नाही त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा, वर्तणुक नियम १९७९ अन्वये विभागीय चौकशी जबाबदारी निश्चित करुन सुरु करण्याचे निर्देश ही स्थायी समिती देते.

तसेच आणखी असे की कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदी आवश्यक असल्यामुळे विभागाने नवीन लघुनिविदा काढाव्या व त्यास सक्षम प्राधिकारणीची मंजुरी घ्यावी यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 76ः–**
**{लोककर्म झोन 7 व 9}**

प्रभाग क्र. 31 अंतर्गत मस्कासाथ पुलाजवळ चोक असलेल्या 35 फुट खोलीवरील ट्रंक लाईनवर चेंबर तयार करण्याची तात्काळ स्वरूपाची खालील प्रमाणे किंमतीची कामे त्यांच्या नावा समोर नमूद कंत्राटदारा कडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 च्या कलम 67 (3) क अंतर्गत मा. आयुक्तांना असलेल्या विशेंषाधिकाराअंतर्गत विनानिविदा करून घेण्यात आली आहेत. या कलमातील तरतूदीनुसार खालील कामांना कार्योत्तर मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने कार्योत्तर मान्यतेस मंजुरी प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

| कामाचे नांव | कामाची किंमत | कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|
| **1) Construction of RCC chamber At mehendibagh road ROB Maskasath Bridge in Prabhag No 31 (CH1)** | **11, 35,650/-** | **M/s Shreya construction** |
| **2) Construction of RCC chamber & slab near maskasath ROB In Prabhag No 31 (CH2)** | **7, 49,940/-** | **M/s Gurudayal Raut** |
| **3) Construction of RCC chamber & slab near maskasath ROB In Prabhag No 31<br>CH3 + CH4<br>11, 57,794 11, 57,794 = 23,15,588/-** | **23, 15,588/-** | **M/s Shreya construction** |

.

<u>ठराव क्रमांक 77</u>:— {समाज कल्याण विभाग} लाडली लक्ष्मी योजना राबविण्यास्तव नियुक्त करावयाच्या ऐजेंसीला देण्यास्तव स्थायी समिती ठराव क्र. 786, दिनांक 25/11/2016 अन्वये E.O.I. क्र. 2017—NMCN—210771—1 काढण्यात आली. प्रस्तुत E.O.I. मध्ये प्राप्त आवेदनकर्त्या मधुन सौ. राधा प्रकाश चकोले/सुपारे यांची अभिकर्ता म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे.

प्रस्तुत लाडली लक्ष्मी योजने मध्ये महानगरपालिके तर्फे 0 ते 1 वर्षाच्या आतील असलेल्या मुलींना ठरविण्यात आलेल्या निकषा प्रमाणे निवडण्यात येवून महानगरपालिके तर्फे प्रथम वार्षीक हप्ता रूपये 3,645/— व त्यानंतरच्या वर्षापासून वय वर्ष 19 वर्षापर्यंत वार्षीक हप्ता रूपये 3,579/— भरावयाचा आहे. या योजने अंतर्गत मुलीच्या 20 वर्षापर्यंत मुलीच्या हप्ता भरायचा असतो व पुढील 5 वर्ष प्रीमीयम भरायचा नाही पालीसीचे फायदे खालील प्रमाणे असते.

| | |
|---|---|
| मुलींच्या वयाच्या | 20 व्या वर्षी — रू. 11,250/— राशी |
| | 21 व्या वर्षी — रू. 11,250/— राशी |
| | 22 व्या वर्षी — रू. 11,250/— राशी |
| | 23 व्या वर्षी — रू. 11,250/— राशी |
| | 24 व्या वर्षी — रू. 11,250/— राशी |
| | 25 व्या वर्षी — रू. 1,42,500/— राशी (आजच्या बोनसप्रमाणे) |

याप्रमाणे एकूण मिळणारी राशी रू. 1,98,750/— इतकी राहील.

योजनेचे इतर फायदे करारनाम्यातील अटी उपलब्ध आहेत. **E.O.I.** व्दारा निवडलेली अभिकर्ता सौ. राधा प्रकाश चकोले/सुपारे यांना अपेक्षित 1000 लाभार्थी मर्यादेइतके 1 वर्षाकरिता किंवा जिवन तरूण योजना सुरू राहील. यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत कार्यादेश व कारानाम्यातील अटीन्वये कार्य देणे. तद्नंतर काम समाधनकारक असल्यास मुदतवाढ देता येऊ शकेल हा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयास तीन वर्षाकरिता मंजुरी प्रदान करण्यात येते. दर सहा महिन्याचा या योजेचा प्रगती अहवाल विभागाने स्थायी समिती समोर सादर करणे अनिवार्य राहिल. अभिकर्ता चे कार्य समाधानकारक नसल्यास दिलेल्या व विहित केलेल्या मुदतीच्या आत स्थायी समितीच्या मान्यतेने रद्द करण्यात येईल या अटी व सुचनेसह समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 78</u>:— {कारखाना विभाग} गांधीबाग झोन क्र. 06, करीता 01 नग सक्शन कम जेटिंग मशिन खरेदी करण्याचे कामास्तव प्राप्त एकमेव निविदाकार मे. काम अविदा ईन्वायरो इंजि. प्रा.लि. पुणे यांचेसोबत वाटाघाटीनंतर प्राकलणीय राशी रु. 56,70,000/- पेक्षा 11.43% कमी दराची रु. 50,21,917.88 राशीची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

(सदर खर्च आरोग्य विभागाचे पद क्र. A43401171602 अतंर्गत राहील.)

<u>ठराव क्रमांक 79</u>:— {विद्युत विभाग} नेहरुनगर झोन क्र. ०५, मधिल भांडेवाडी डंम्पींग यार्ड येथे २० मी. उंच हायमास्ट व भांडेवाडी डंम्पींग यार्ड ते बिडगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुधारीत व अद्यावत प्रकाश प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु.२८,२३,९८४/- ची प्राकलनीय राशीपेक्षा ६.८% ने कमी असलेली रु. २६,३१,९५३/- ची निम्नतम दराची में. सोनू इलेक्ट्रिकल, नागपूर यांच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 80:– नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा (जिल्हास्तर) योजना
{लोककर्म झोन 03} अंतर्गत एकुण रू. १४,१४,८७५/– रकमेचे १ कामाचा प्रसताव शासनास सादर करावयाचा असून या कामाकरीता महाराष्ट्र शासनाचे १०० टक्के अनुदान प्राप्त असून या करीता म.न.पा. च्या दक्षिण नागपूर क्षेत्रातील खाली दिलेल्या १ कामाचा समावेश करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्राकलनिय राशी |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३४ अंतर्गत संजय गांधीनगर , भोले बाबा नगर , श्रीरामनगर व विविध ठिकाणी सिव्हरलाईन टाकण्याचे काम. | १५,१४,८७५/– |
| | एकुण राशी | १५,१४,८७५/– |

ठराव क्रमांक 81:– स्थायी समिती ठराव क्र. ८८३ दिनांक २७/१२/२०१७
{विद्युत विभाग} नुसार "नागपूर शहरातील दहा झोन्स् अंतर्गत अस्तित्वात असलेले पारंपारीक पथदिवे (सोडीयम व्हेपर, मेटल हलाईड, टयुब लाईट्स, सि.एफ.एल. इत्यादी) उर्जाकार्यक्षम एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलविणे तसेच हे संपूर्ण पथदिवे ज्या यंत्रणेत आहेत त्या यंत्रणेतील निकामी केबल्स् बदलणे, तुटलेल्या खांबाच्या ठिकाणी नविन खांब बसविणे इत्यादी कामे ८४ ई.एम.आय. (इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंटस्) व्दारा परतफेड करण्याच्या धर्तीवर बदलणे, मेट्रो रेल रुट वरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करणे व रिंग रोड वरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करण्याचे कामाचे रेग्युलर पध्दतीने भुगतान करणे व या संपूर्ण यंत्रणेची संपूर्ण कंत्राटाच्या काळात (१५ महिन्यांचा जेस्टेशन पिरीअड + ८४ महिन्यांचा परतफेडीचा काळ = ९९ महिने) देखभाल दुरुस्ती करणे" या कामातील इन्फास्ट्रक्चर स्ट्रेंदनिंग या कामाकरीता कंत्राटदाराने काम केल्यानंतर ई.एम.आय. रुपाने देय असणा–या रकमेचा विचार करता महानगरपालिकेने बॅंके तर्फे कामाची संपूर्ण रक्कम एकमुश्त वळती केल्यास महानगरपालिकेचा आर्थीक फायदा होत असल्यास तसा तपासुन प्रशासनाने त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान करण्यात आलेली असल्याचे अनुषंगाने अंमलबजावणीकरीता या कामास्तव एकूण रुपये ७३ कोटीची रक्कम (रिंगरोडवरील प्रकाश व्यवस्थेचे नविनीकरण करणे याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनीक बांधकाम विभागाकडुन निधी प्राप्त न झाल्यास या खर्चाच्या रु. १४ कोटीच्या रकमेचा समावेश करुन 'महाराष्ट्र शासनास' एकूण रु. ७३ कोटी) कर्जरुपाने उभारण्यास 'महाराष्ट्र शासनास' विनंती करण्यास स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा व सदर प्रस्ताव महासभेपुढे मंजूरी प्रदान करण्यास्तव ठेवण्याचा प्रश्न विचारात घेऊन राज्य शासनाकडुन जोपर्यंत कर्जास मंजुरी प्राप्त होत नाही. तोपर्यंत अर्थसंकल्पीय तरतुदी मधून कंत्राटदारांना E.M.I. भुगातन करावे जेणे करुन हे कार्य सुरळीत सुरु राहिल या शिफारसीसह विषय मा. सभागृहास मंजुरीकरिता पाठविण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 82:– नागपूर महानगरपालिका हद्दीतील मोकाट श्वानांच्या
{आरोग्य विभाग} नसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टीरेबीज लसीकरण कार्यक्रम शासकिय पशुवैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. परंतु शासकिय पशुवैद्यकिय महाविद्यालयाव्दारे अत्यंत कमी प्रमाणात म्हणजेच सरासरी दिवसाला एक श्वानाची नसबंदी शस्त्रक्रिया होत आहेत. शहरातील मोकाट श्वानांची वाढती संख्या लक्षात घेता पशुवैद्यकिय महाविद्यालयाव्दारे सुरु असलेल्या नसबंदी

केंद्राव्यतिरीक्त ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीयाचे मान्यताप्राप्त जास्तीत जास्त अनुभवी व इच्छुक सेवाभावी संस्थांचा सहभाग घेवून Animal Birth Control(Dogs) Rules, 2001 नुसार व दिनांक ११/११/२०१६ चे शासन निर्णयानुसार मोकाट श्वानांच्या नंसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टीरेबीज लसीकरण कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविणे आवश्यक आहे. जेणे करुन मोकाट श्वानांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणणे शक्य होईल.

यासंदर्भात दिनांक २९/०४/२०१७ रोजीच्या मा. महापौरजी यांचे अध्यक्षतेखाली व मा. सत्तापक्षनेते यांचे उपस्थीतीत संपन्न झालेल्या सभेमध्ये प्राप्त निर्देशानुसार मोकाट श्वानांच्या नंसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टीरेबीज लसीकरण मोहीम राबविण्याबाबत कृती आराखडा तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

अ. मोकाट श्वानांच्या नंसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टीरेबीज लसीकरणाकरीता ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीया व्दारे मान्यताप्राप्त अनुभवी व इच्छुक संस्थेची नियुक्त करण्याकरीता राष्ट्रीय पातळीवर जाहीरात प्रसिध्द करण्यात येईल.

ब. Animal Birth Control(dogs) Rules, 2001 मधील कलम ४ नुसार या उपक्रमावर देखरेख ठेवण्याकरीता संनियंत्रण समिती गठीत करण्यात येईल. तसेच प्रत्येक शस्त्रक्रिया केंद्रावर नियंत्रण ठेवण्याकरीता उपसमिती गठित करण्यात येईल.

क. ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीया यांचे दिनांक २२/०२/२०१६ चे पत्रानुसार नसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टीरेबीज लसीकरणाकरीता ठरविण्यात आलेला रु. ७००/— प्रति श्वान दराने मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया व अन्टीरेबीज लसीकरण कार्यक्रम शहरामध्ये राबविण्यात येईल. तसेच प्रति श्वान रु. ७००/— हा दर वाजवी वाटत नसल्यामुळे सदर दरामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने ॲनिमल वेलफअर बोर्ड ऑफ इंडीया, चेन्नई यांना व राज्य स्तरीय संनियंत्रण समिती, मुबई यांना प्रस्ताव पाठविण्यात येईल आणि ॲनिमल वेलफअर बोर्ड ऑफ इंडीया, चेन्नई किंवा राज्य स्तरीय संनियंत्रण समिती, मुंबई यांचेकडून सुधारीत दर प्राप्त झाल्यास तो प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येईल.

शहरातील किमान ५०००० मोकाट श्वानांचे लक्ष्य ठेवून उपक्रम राबविल्यास रु. ७००/— प्रति श्वान दरानुसार रु. ३५० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तसेच ॲनिमल वेलफअर बोर्ड ऑफ इंडीया, चेन्नई किंवा राज्य स्तरीय संनियंत्रण समिती, मुंबई यांचेकडून सुधारीत दर प्राप्त झाल्यास तो प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून लागू करणे असल्यामुळे सुधारीत दरानुसार अपेक्षित खर्चामध्ये सुध्दा वाढ अपेक्षित आहे. सदर खर्च पद क्र. A 44601272408 अंतर्गत करण्यात येईल. सदर पदाअंतर्गत रु. २५ लक्ष राशीचे प्रावधान उपलब्ध असल्यामुळे त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

मा. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर प्रति श्वान रु. ७००/— दरानुसार ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीया, चेन्नई यांची मान्यताप्राप्त अनुभवी व इच्छुक सेवाभावी संस्थांकडून Expression of Interest व्दारे प्रस्ताव मागविण्यात येईल.

सबब प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रत्येक महिन्यात कामाच्या प्रगतीचा अहवाल स्थायी समिती समोर सादर करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 83ः—</u> प्रभाग क्र. 38 ब येथे कापसे चौक ते जुना बगडगंज रोड
{लोककर्म झोन 08} पर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे हे काम प्राप्त निविदाकार मे. संतोष खरपकर यांचे प्राकलनिय दरापेक्षा 14.40 टक्के कमी दराची रू. 57,07,018 /— राशिची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन

यास एकमताने मंजूरी प्रदान केली. या कामाचा खर्च पद क्र. 649, ए 42001361002 स्पेशल गव्हरमेंट ग्रॉन्ड अंतर्गत प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 84</u>:— {साप्रवि विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर महत्वाच्या विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता एकुण 3 पर्यवेक्षक व 76 सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) कार्यरत असुन कंत्राटाची मुदत दि. 15/06/2017 ला संपुष्टात येत आहे. पुढील दि. 16/06/2017 ते 15/06/2018 पर्यंत एक वर्षाचे कालावधी करीता शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे (मेस्को) यांना कंत्राटाची मुदतवाढीस मंजुरी व आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षकाचे संख्येत बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे व नविन कार्यादेश होईपर्यंत शासनाचे किमान वेतन व भत्ता लागु असलेले सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या भत्ते प्रमाणे कार्यादेशास मुदतवाढ देणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 85</u>:— {उद्यान विभाग} केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत हरित क्षेत्र विकास (Green Space Devlopment) करण्याकरिता तुलसीनगर उद्यान व जागृती कॉलनी उद्यानात विविध कामे करणे या कामाकरिता राशी रु. 95,37,739/— रक्कमेच्या कामास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. अमृत—2016/प्रक्र. 146/नवि.—33 दि. 20.12.2016 नुसार प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त तीन निविदापैकी निम्नतम निविदा मे रेन्बो ग्रीनर्स यांची 0.5 % कमी दराची रु. 94,90,050/— राशीची प्राप्त असून या निम्नतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 86</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर